N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): कोल्हापूर **P.S.**(ठाणे): हातकणंगले **Year** (वर्ष): 2022
   **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0333 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 02/09/2022 18:26 बजे
2. | S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
   |---|---|---|
   | 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
   1. **Day**(दिवस): दरमियानी दिन
      **Time Period** (कालावधी):
      **Date From** (दिनांक पासून): 29/08/2022
      **Date To** ( दिनांक पर्यंत): 02/09/2022
      **Time From** (वेळेपासून): 14:00 बजे
      **Time To** (वेळेपर्यंत): 12:00 बजे

   (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
   **Date** (दिनांक ): 02/09/2022 **Time** (वेळ): 18:00 बजे
   (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
   **Entry No.** (नोंद क्र.): 032 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 02/09/2022 18:00 बजे
4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
   1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 01 किमी
   **Beat No.** (बिट क्र.):
   (b) **Address** (पत्ता): हातकणंगले

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
   **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
   **District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
   (a) **Name** (नाव): प्रदिप सुरेश पाटील
   (b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
   (c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
   (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
   (f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):
   **Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

   | S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
   |---|---|---|
   | 1 | . | |

   (h) **Address** (पत्ता):



Scanned by TapScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | रूकडी,हातकणंगले,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | रूकडी,हातकणंगले,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नामदेव औदुंबर कचरे | | | 1. राजपत्नु मंगल कार्यालयाजवळ,उचगाव , करवीर,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या, 4 नोटा | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 02/09/2022 मी प्रदिप सुरेश पाटील, वय 33 वर्ष, व्यवसाय - टु व्हीलर मेकनिक, रा. मु.पो.रूकडी, ता. हातकंणगले, जि. कोल्हापूर, मो.नं. 8668835045 आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की, मी एकत्रित कुटूंबियांसह वरील पत्यावर राहणेस आहे. माझा माहे एप्रिल 2017 मध्ये व्हन्नापुर, ता.जि. धारवाड, राज्य कर्नाटक येथे राहणा-या सानिका हिचेशी विवाह झाला होता. विवाह झालेनंतर पत्नी सौ सानिका ही चार ते पाच दिवसानंतर माहेरी निघुन गेली व तिने कौटुंबिक न्यायालय धारवाड राज्य कर्नाटक येथे पोटगी करीता दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये मी सुनावणीसाठी हजर राहिलो नसल्याने माझे नावचे अटक वरंट धारवाड कौटुंबिक न्यायालयाने काढुन ते बजावणीकरीता हातकणंगले पोलीस ठाणे येथे पाठविले होते. सदर वारंट मध्ये मला दि. 22/08/2022 रोजी कोर्टात हजर ठेवणेबाबतची तारीख देण्यात आली होती. माझे नावचे अटक वरंटचे काम पोलीस कचरे साहेबांकडे होते. दिनांक 08/08/2022 रोजी पोलीस कचरे यांनी मला पोलीस ठाणमध्ये बोलवुन घेवुन मला अटक करण्याची भिती दाखवुन माझेकडुन 5000/- रू. घेवुन त्यांनी मला सोडुन दिले होते. परंतु माझा अपघात होवुन पायास दुखापत झाल्याने मी दिनांक 22/08/2022 रोजी चे तारखेस धारवाड कोर्टात हजर राहु शकलो नाही. त्यानंतर दि. 27/08/2022 रोजी मला कचरे साहेब यांनी पोलीस ठाणे येथे बोलवुन घेतले व दिनांक 01/09/2022 रोजीचे पुन्हा माझे नावाचे अटक वारंट आल्याचे सांगुन त्यामध्ये अटक न करणेसाठी त्यांनी माझेकडे पुन्हा 3000/- रू. ची मागणी करू लागले. पैसे दिले नाही तर अटक करण्याची भिती घातली, त्यावर मी त्यांना पैशाची जुळणी करून भेट घेतो असे सांगुन निघुन आलो. हातकणंगले पोलीस ठाणेचे पोलीस कचरे यांनी माझे नावे निघालेल्या अटक वारंट मध्ये मला अटक न करणेसाठी माझेकडे मागणी करत असलेले 3000/- रू. हे लाच म्हणुन मागणी करत असल्याची माझी खात्री पटली आहे परंतु मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसलेने मी दि. 29/08/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे जावुन पोलीस उपअधीक्षक श्री बुधवंत साहेबांना भेटुन त्यांचेकडे माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. त्यानंतर त्यांनी त्यांचे कार्यालयाकडील पोलीस निरीक्षक कुंभार साहेबांना त्यांचे केबीनमध्ये बोलवुन माझा तक्रारी अर्ज त्यांचेकडे देवुन त्यांना माझे तक्रारीवर कारवाई करणेबाबतचा मौखीक आदेश दिला. त्यावर त्यांनी माझा तक्रारी अर्ज वाचुन त्यांनी कारवाईसाठी उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ कार्यालय,कोल्हापुर कार्यालयाकडुन दोन षासकिय पंचांना बोलावुन घेतले. तसेच त्यांचे कार्यालयातील कर्मचारी श्रेणी पोलीस उप निरीक्षक बंबरगेकर,पोना 983/विकास माने,पोना.1480/सुनिल घोसाळकर,पोना.1/नवनाथ कदम यांचेषी तसेच पंचांषी माझी ओळख करुन देवुन मला माझी तक्रारी पंचांना सांगणेस सांगीतली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर कुंभार साहेबांनी माझी लेखी तक्रार पंचांना वाचावण्यास दिली. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असलेची पंचांची खात्री झाली. त्यानंतर कुंभार



Scanned by TapScanner

साहेबांनी व दोन्ही पंचांनी माझे लेखी तक्रारीखाली सहया केल्या. त्यानंतर कुंभार साहेबांनी मला व दोन्ही पंचांना पोलीस कचरे साहेब हे माझेकडे
लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. तसेच सदर कामी पंच नं.1 म्हणुन सुविर कामत व
पंच नं.2 म्हणुन श्रीपती दळवी हे काम पाहतील असे पोनि कुंभार साहेबांनी सांगीतले. त्यानंतर कुंभार साहेबांनी मला पोलीस कचरे साहेब यांनी
कुठे भेटायला बोलविले आहे असे विचारले असता त्यांना मी कचरे साहेबांनी हातकणगले पोलीस ठाणेस ये म्हणुन सांगीतले असल्याचे सांगीतले.
त्यानंतर कुंभार साहेबांनी मला व पंचाना हातकणगले येथे जवळ असलेल्या रामलिंग फाटा येथुन पडताळणीकरीता जाणेचे असल्याचे सांगीतले.
कुंभार साहेबांनी मला माझेकडे कोणते वाहन आहे असे विचारले असता त्यांना मी मोटर सायकलवरून आलो असल्याचे सांगीतले. त्यावेळी
त्यांनी मला मोटरसायकलने रामलिंग फाटा येथे असले महालक्ष्मी मंदिराजवळ जाणेस सांगुन ते लागलीच सरकारी गाडीतुन रामलिंग फाटा येथे
येथे असल्याचे सांगीतले. मी रामलिंग फाटा येथे मंदिराजवळ आलो त्यानंतर काहीवेळात कुंभार साहेब त्यांचा स्टाफ व पंच असे सुमोगाडीतुन
रामलिंग फाटा येथे असले मंदिराजवळ आले. पोनि कुंभार साहेबानी मला सुमो गाडीमध्ये बोलावुन घेतले व पोलीस कचरे साहेब हे
माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबांबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. तसेच पडताळणीकरीता माझे सोबत पंच
कामत यांना पाठवणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी शासकीय गाडीमध्येच त्यांचे कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून
त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड घालून मला, व पंच कामत यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यावेळी कुंभार साहेबांनी मला
पोलीस कचरे साहेब हे पोलीस ठाणेत आहेत का याबाबत फोन करून खात्री करणेस सांगीतले त्यावेळी मी माझे मोबाईल वरून कचरे साहेब यांचा
मोबाईल नंबर 9822403501 वरती फोन केला तो फोन कचरे साहेबांनी उचलला त्यांना मी कोठे आहे असे विचारले असता त्यांनी मला ते
पोलीस ठाणेस असल्याचे सांगुन पोलीस ठाणेस येण्यास सांगीतले. त्यानतर कुंभार साहेबांनी शासकीय गाडीमध्ये त्यांचेकडील डिजीटल व्हाईस
रेकर्डर चालू करुन तो माझे गळयात अंगावरील शर्टचे आतील बाजुस अडकवून दिला. त्यानंतर मी व पंच कामत असे माझे मोटर सायकलवरून
हातकणंगले पोलीस ठाणे येथे गेलो तेथे गाडी पार्क केली व मी पुन्हा कचरे साहेबांना फोन करून हातकणंगले पोलीस ठाणेचे बाहेर आल्याचे
सांगुन आत येवु काय असे विचारले त्यावेळी त्यांनी आत येण्यास सांगीतले मी व पंच कामत पोलीस ठाणेत गेलो. त्यावेळी कचरे साहेब मला
पोलीस ठाणेत भेटले त्यावेळी त्यांनी पंच कामत यांना हा तुमचा कोण आहे असे विचारले त्यावेळी पंच कामत यांनी मी त्यांचा पुतण्या असल्याचे
सांगीतले. त्यानंतर ते पोलीस कचरे साहेब यांनी मला एक कागद दाखवत असे वारंट येतात अजुन रिकव्हरी वांरट आलेल दिसत नाही त्यामध्ये
कोर्ट प्रापर्टी जप्त करून लेडीजला पैसे द्यायला लागत्यात असे वगैरे बोलुन तुझ काय असले ते मिटव तु मागच्या तारखेला का गेला नाहीस असे
विचारले त्यावेळी मी त्यांना गाडीवरून पडलो होतो असे सांगीतले. त्यानंतर त्यांनी वांरट कन्सल करून पावती आणुन दे असे म्हणाले. त्यानंतर
त्यांचेत व माझेत वांरटचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यानंतर कचरे साहेब यांनी मला आणि काय मदत करू असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना आज
काय लय पैसे आणलो नाही असे म्हणालो त्यावेळी कचरे साहेब यांनी तु पण काय पण दे मी काय हे करत नाही किती आणलेत पैसे असे म्हणाले
त्यावेळी मी त्यांना पाचशे रूपये आणलोय असे म्हणालो त्यावेळी कचरे साहेबांनी ठिक हाय तुझी इच्छा असेल तर दे नाय तर ते पण राहु दे अजुन
काय सांगु असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना एक काम करा की मी जावुन आल्यानंतर तुम्हाला दिल तर चालल का विचारले त्यावेळी कचरे यांनी
जा जा जा उद्या आधी तु ते काम कर आणी परत माझ्याकड ये आणी काय सांगु असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना आता पैशाच्या नियोजनामध्ये
हाय असे म्हणालो त्यावेळी कचरे पोलीस यांनी जा जा, बर का तुझ मी परवा दिवशी तुझ काय एकणार नाही असे म्हणुन वारंट कन्सल केलेनंतर
पावती घेवुन येण्यास सांगीतले. त्यानंतर मी व पंच कामत असे मोटर सायकलवरून कुंभार साहेब थांबलेले ठिकाणी परत आलो होतो. त्यानंतर
माझेकडे विचारणा केली असता मी त्यांना वरीलप्रमाणे घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर कुंभार साहेबांनी यांनी झाले कारवाईचा पंचनामा
केला. दिनांक 30/08/2022 रोजी सकाळी 09..00 वाजता मी घरी असताना माझे वकील सुदर्शन पाटील यांचा मला फोन आला की, कचरे
साहेबांनी मला उचगाव येथे भेटण्यास बोलविले असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी लागलीच पोनि कुंभार साहेबांना फोन करून सदरबाबत त्यांना
कळविले असता त्यांनी मला सकाळी 11.30 वा. पर्यत अँन्टी करप्शन ऑफीस कोल्हापूर येथे येण्यास सांगीतले. मी अँन्टी करप्शन ऑफीस
कोल्हापूर येथे आलो त्यावेळी तेथे कुंभार साहेब, पंच व पोलीस स्टाफ हजर होते. त्यावेळी कुंभार साहेबांनी तुम्हाला कोणाचा फोन आलेला व
काय निरोप दिला हे पंचाना सांगणेस सांगीतले त्यावेळी मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर कुंभार साहेबानी मला पोलीस कचरे हे
माझेकडे लाच मागणी करतात अगर करे याची पडताळणी करणार आहोत असे सांगुन पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या.
त्यावेळी कुंभार साहेबांनी पोलीस कचरे यांनी मला उचगाव फाटा येथे येण्यास सांगीतले असल्याने पुढील कारवाई टेंबलाई मंदिर परिसर येथे
करण्याचे ठरले त्याप्रमाणे आम्ही सर्वजण टेंबलाई मंदिर परिसर कोल्हापूर येथे गेलो. तेथे आम्ही रोडचे आडबाजुला आमची वाहने थांबविली.
त्यानंतर कुंभार साहेबांनी मला कचरे साहेबांना फोन करून ते कोठे आहेत याबाबत माहीती घेणेस सांगीतले त्यावेळी मी माझे मोबाईल वरून
कचरे साहेब यांना फोन लावला असता कचरे साहेबांनी मला उचगाव फाटा येथे येण्यास सांगीतले. त्यानतर कुंभार साहेबांनी त्यांचेकडील
डिजीटल व्हईस रेकर्डर चालू करुन तो माझे गळयात अंगावरील शर्टचे आतील बाजुस अडकवून दिला. त्यानंतर मी व पंच कामत असे माझे मोटर
सायकलवरून उचगाव फाटा येथे गेलो तेथे जावुन मी कचरे साहेबांना फोन लावला त्यावेळी त्यांनी मला उचगाव कमानी जवळ येण्यास सांगीतले.
मी व पंच कामत उचगाव कमानीजवळ गेलो तेथे आम्हाला कचरे साहेब भेटले. त्यावेळी माझेत व त्यांचे वारंट व वारंट मधील जामीनदार
वकीलांना दिले काय याबाबत बोलणे झाले. त्यावेळी त्यांनी मला कोर्टातुन वारंट कन्सल कराव लागतय असे म्हणाले त्योवळी मी त्यांना ठिक
आहे असे म्हणालो त्यानतर कचरे साहेबांनी मला काय आणलय का असे विचारले त्यावेळी मी त्यांना साहेब किती असे म्हणालो त्यावेळी कचरे
साहेबांनी काय आणलय असे विचारले त्यावेळी मी त्यांना तुम्ही सांगा असे म्हणालो, त्यावेळी कचरे साहेब यांनी नायतर पैसे नसल तर परत दे
माझ असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना तुम्ही एक आकडा तर सांगा असे म्हणालो. त्यावेळी कचरे साहेबांनी पंचाकडे बघुन मोबाईल हातात घ्या
आम्हाला भिती वाटते असे म्हणाले त्यावेळी पंचानी तस काय नाय असे म्हणाले त्यावेळी कचरे साहेबांनी हाताचा इशारा करून मला दोन बोटे
दाखविली त्यावेळी मी त्यांना किती दोन असे म्हणालो त्यावेळी कचरे साहेब हु असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना एक दहा पंधरा मिनटात आणुन
देतो, फक्त काय करणार हाय एटीएम मधन काढुन आणुन देतो, देतो दोन देतो असे म्हणालो त्यावेळी कचरे साहेब ठिक आहे, आरे इथ एटीएम
हाय असे म्हणाले त्यावेळी मी एटीएम जवळ जावुन परत येवुन कचरे साहेबांना एटीएम कार्ड विसरुन आलोय, मित्राकड जावुन घेवुन येवु असे
म्हणालो त्यावेळी कचरे साहेबांनी आत्ता किती हायत तुझ्याकडे असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना माझेकडे काहीच नाही असे म्हणालो त्यावेळी
कचरे साहेबांना पंच कामत यांना तुमच्याकडे आहेत की पाचशे असे म्हणाले त्यावेळी पंच कामत येतो की लगीच देतो की, काय त्यात ऐवढ असे
म्हणाले. त्यावेळी कचरे साहेब राहुदे म्हणाले त्यावेळी मी त्यांना साहेब देतो की असे म्हणुन तेथुन निघुन पोनि कुंभार साहेब थांबले ठिकाणी
आलो. त्यावेळी कुंभार साहेबांनी माझेकडील डिजीटल व्हईस रेकर्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर माझेकडे विचारणा केली असता मी
त्यांना वरीलप्रमाणे घडलेली हकीकत सांगीतली. कुंभार साहेबांनी मला व पंचांना सापळा पुर्व कारवाई सुरु करीत असलेचे सांगितले.
त्यावेळी मला कुंभार साहेबांनी पोलीस कचरे यांना देणेसाठीची लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी माझेकडे उपलब्ध असलेले
500/- रु. दराच्या 04 नोटा मिळून रु.2000/- लाच म्हणून देणेसाठी हजर केले. तेव्हा त्यांचेकडील स्टाफमधील पो.ना.घोसाळकर यांनी
नोटांचे नंबर्स लिहून घेतले. त्यानंतर कुंभार साहेबानी मला आणि पंचांना अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे महत्व सांगुन गुणधर्म



Scanned by TapScanner

सांगितले. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पांढरा कागद अंथरुन त्यावर लाच रक्कमेतील नोटा ठेवून पो.ना.घोसाळकर यांनी अँन्थ्रॉसिन पावडर लावून घेतली व थांबलेल्या ठिकाणी अंधार करुन नोटांची अल्ट्राव्हायोलेट बॅटरीचे सहायाने मला व पंचांना तपासणी करुन दाखविली. त्यानंतर घोसाळकर यांनी ती लाच रक्कम रु.2000/- माझे पॅन्टचे पुढील बाजुचे उजव्या बाजुचे खिशात घडी करुन ठेवली. त्यानंतर कुंभार साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड घालून मला, दोन्ही पंच व त्यांचा स्टाफ यांना सापळ्याचे अनुषंगाने सुचना दिल्या. कुंभार साहेबांनी मला पोलीस कचरे यांनी लाच रक्कम घेवून कोठे बोलाविले आहे असे विचारले असता त्यांनी उचगाव कमानी जवळ बोलाविले असल्याचे सांगितले. पोलीस कचरे यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर माझे डोक्यावरील टोपी डावे हाताने काढण्याचा इशारा करणेचा आहे असे कुंभार साहेबांनी सांगितले.
त्यानंतर कुंभार साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तो माझे गळ्यात षर्टचे आतील बाजूस अडकविला. तेथून मला व पंच कामत यांना पोलीस कचरे यांची भेट घेण्यासाठी पाठविले. कुंभार साहेब व त्यांचा स्टाफ आणि पंच दळवी असे त्यांचेकडील वाहनातुन आमचे पाठोपाठ आले. मी व पंच कामत असे उचगाव मध्ये गेलो तेथे गेलेनंतर कचरे साहेबांना फोन केला त्यावेळी कचरे साहेबांनी ते आता भेटणार नसून धारवाड चे कोर्टातील वॉरंट रद्द करुन नंतर भेट असे सांगितले. त्यानंतर मी परत येवुन घडलेली हकीकत कुंभार साहेबांनी सांगितली. पोलीस कचरे साहेब यांनी मला लाच रक्कमे बाबत नकार दिला नसलेने मी धारवाड कोर्टातून माझेवर असलेले वॉरंट रद्द करुन आलेनंतर पोलीस कचरे साहेब यांची भेट घेण्याचे ठरविले. त्यानंतर कुंभार साहेबांनी यांनी झाले कारवाईचा पंचनामा केला.
दिनांक 01/09/2022 रोजी कचरे साहेब यांचा मला फोन आला की तुम्ही वारंट कॅन्सल करायला गेला आहे की नाही त्यावेळी मी त्यांना वारंट कॅन्सल करायला चालली आहे असे सांगितले. त्यानंतर माझे कोर्टातील काम संपलेनंतर कचरे साहेबांचा माझे फोनवर कॉल अलर्टचा मेसज आला त्यामुळे मी कचरे साहेबांना फोन केला त्यावेळी मी त्यांना वारंट कॅन्सल झाले नसुन कोर्टात पोटगीचे पैसे भरा असे सांगितले असल्याचे सांगितले. त्यावेळी कचरे साहेबांनी मला येताना भेटायला ये असे सांगितले परंतु मला वेळ झाल्याने त्यांना फोन करुन सांगीतले त्यावेळी त्यांनी मला उद्या सकाळी हातकणंगले पोलीस ठाणेस भेटायला ये असे सांगितले. त्यानंतर मी कुंभार साहेबांना फोन करुन सदरबाबत सांगितले त्यावेळी कुंभार साहेबांनी मला ते उद्या सकाळी हातकणंगले येथे असल्याचे सांगीतले.
आज दिनांक 02/09/2022 रोजी मी व कुंभार साहेब फोनवरुन एकमेकांचे संपर्कात होतो. कुंभार साहेबांनी मला ते सकाळी 11.30 वा पर्यंत हातकणंगले येथे येत असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना हातकणंगले आयटीआय कॉलेज समोर असले रोडवरती येण्यास सांगीतले. कुंभार साहेब, पंच व त्यांचा स्टाफ असे 11.30 वा चे सुमारास आयटीआय कॉलेज समोर असले रोडवरती आले तेथे मला कुंभार साहेबांनी परत त्यांचा स्टाफ व पंचाची ओळख करुन दिली. कुंभार साहेबांनी मला व पंचांना सापळा पुर्व कारवाई सुरु करीत असलेचे सांगितले. त्यावेळी मला कुंभार साहेबांनी मी त्यांचेकडे दिलेली 2000/- रुपये लाच रक्कम काढली सदरच्या नोटा मी पुर्वी दिलेल्याच होत्या तेव्हा त्यांचेकडील स्टाफमधील पो.कॉ.देसाई यांनी ती लाच रक्कम रु.2000/- माझे शर्टचे डाव्या बाजुचे खिशात घडी करुन ठेवली. त्यानंतर कुंभार साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पुर्वीचे सापळापुर्व कारवाई वेळी वापरलेले मेमरी कार्ड मला व पंचाना दाखवुन त्यामधील पुर्वीची एक फाईल असलेली दाखविली त्यानंतर मला, दोन्ही पंच व त्यांचा स्टाफ यांना सापळ्याचे अनुषंगाने सुचना दिल्या. कुंभार साहेबांनी मला पोलीस कचरे यांनी लाच रक्कम घेवून कोठे बोलाविले आहे असे विचारले असता मी कचरे साहेबांना फोन केला असता त्यांनी हातकणंगले पोलीस ठाणेत येण्यास सांगितले. पोलीस कचरे यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर माझे डोक्यावरील टोपी डावे हाताने काढण्याचा इशारा करणेचा आहे असे कुंभार साहेबांनी सांगितले.
त्यानंतर कुंभार साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तो माझे गळ्यात षर्टचे आतील बाजूस अडकविला. तेथून मला व पंच कामत मोटरसायकलवरुन पोलीस कचरे साहेबांची भेट घेण्यासाठी हातकणंगले पोलीस ठाणे येथे पाठविले कुंभार साहेब व इतर स्टाफ व पंच नं. 2 दळवी असे सुमोगाडीतुन आमचे पाठोपाठ आले. पोलीस ठाणेचे समोर गेल्यावर मी कचरे साहेबांना फोन केला, त्यावेळी त्यांनी ते पोलीस ठाणेचे बाहेर येत असल्याचे सांगितले त्यानंतर कचरे साहेब बाहेर आले त्यावेळी त्यांचेत व माझेत वारंट चे व वारंटचे अनुषंगाने धारवाड कोर्टात कायकाय झाले याबाबत बोलणे झाले त्यानंतर त्यांनी मला काय आणलाय काय असे विचारले त्यावेळी मी त्यांना काय ते सांगा की असे म्हणालो त्यावेळी मला त्यांनी पोलीस ठाणेचे बाजुली असले रेल्वे स्टेशन कडे जाणारे रस्त्याचे बाजुला घेवुन गेले त्यानंतर पुन्हा त्यांचेत व माझेत वारंटचे बाबत बोलणे चालले त्यावेळी त्यांनी मला तु वारंट कॅन्सल नाही केलेस तर मी तुला अटक करु काय असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना साहेब एकदा चान्स द्या असे म्हणालो. त्यावेळी कचरे साहेबांनी मला किती आणलेस तेवढे दे असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना तुम्ही परवा सांगीतलेप्रमाणे 2000/- रुपये आणले आहेत ते मोजुन घ्या असे म्हणुन मी माझे खिशातील लाच रक्कम काढुन त्यांचेकडे दिली. त्यांनी ती डाव्या हाताने घेवुन त्यांचे पॅन्टचे डाव्या खिशात ठेवली. तेंव्हा मी माझे डोक्यावरील टोपी डावे हाताने काढुन पोलीस कचरे यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केला. तेव्हा कुंभार साहेब व त्यांचे सोबतचा स्टाफ यांनी आमचेजवळ येवुन पोलीस कचरे साहेबांना पकडले. त्यांचेकडून पंच साक्षीदार यांचेसमक्ष कुंभार साहेब यांनी लाच रक्कम रु.2,000/- ताब्यात घेतली आहे. त्यावेळी पोलीस कचरे पुर्ण नाव नामदेव औंदुबर कचरे, वय 36, पोना/837, नेम. हातकणंगले पोलीस ठाणे असे असल्याचे समजले आहे.
सदर कारवाईमध्ये हातकणंगले पोलीस ठाणेचे पोलीस कचरे साहेब यांनी माझे विरुध्द धारवाड कोर्टाचे आले वारंटमध्ये अटक न करणेसाठी व वारंटचे कामी मदत करणेसाठी माझे माझेकडे 2,000/- रु. लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडले आहे. म्हणून माझी नामदेव औंदुबर कचरे, वय 36, पोना/837, नेम. हातकणंगले पोलीस ठाणे, यांचेविरुध्द फिर्याद आहे.



Scanned by TapScanner

13. Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये दरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): KONDIRAM NAMDEV PATIL(I (Inspector)) / PI or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):
Rank (पद):
No.(क्र.): to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
कुवारी प्रदीप सुरेश पाटील

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
हातकणंगले पोलीस स्टेशन

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिकारी-याची सही)
Name (नाव): KONDIRAM NAMDEV PATIL
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PI



Scanned by TapScanner